# मृत्युपत्रकर्ता यांचे मृत्युनंतर,मृत्युपत्र नोंदणी करणे
# सनद 1.10

अ) मृत्युपत्रकर्ता यांचे मृत्युनंतर,मृत्युपत्र नोंदणी करणेसाठी संबंधिताकडून करावयाची कार्यवाही-

1. असे मृत्युपत्र मृत्युपत्राची अंमलबजावणी करणेसाठी मृत्युपत्रकर्ता यांनी मृत्युपत्राद्वारे,नियुक्त केलेले अमलकर्ता (Executer) किंवा मृत्युपत्राद्वारे दावा सांगणा-या व्यक्तीनी त्यांना सोईस्कर असलेल्या कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी सादर करणे
2. दुय्यम निबंधक, यांची खातरजमा करणेकामी सर्वसाधारणपणे खालील कागदपत्रे जमा करणे

1.मृत्युपत्रकर्ताच्या मृत्युचा दाखला,

2.मृत्युपत्राचा दस्त नोंदणीस सादर करणा-या व्यक्तीना तसे पूर्ण अधिकार आहेत, अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र,

3.संबंधीत सक्षम अशा न्यायालयाचे प्रोबेट किंवा, संबंधीत सक्षम अशा न्यायालयाचे प्रशासक नेमल्याचे प्रमाणपत्र किंवा,

4.खरोखरच मृत्युपत्रकर्त्यानेच त्यांचे मृत्युपत्र निष्पादित /सही करुन ठेवलेले होते याबाबत मृत्युपत्रावर साक्षीदार म्हणून सही करणा-या साक्षीदारांचे जबाब

ब) मृत्युपत्रकर्ता यांचे मृत्युनंतर,मृत्युपत्र नोंदणी करणेसाठी दुय्यम निबंधकाकडून करावयाची कार्यवाही-

1. वरीलप्रमणे कागदपत्रांची खातरजमा केल्यानंतर, मयत मृत्यूपत्राकर्ता तर्फे मृत्युपत्राचा दस्त नोदंणीस दाखल करुन घेणे
2. आवश्यक ती नोंदणी फी घेवून, तशी पावती सादरकर्ता पक्षकारास देणे
3. मयत मृत्यूपत्राकर्ता यांचेतर्फे दावा सांगणा-या व दुय्यम निबंधक कार्यालयात उपस्थीत असणा-या कायदेशीर वारसांचा कबूलीजबाब नोंदविणे
4. ओळखत असलेल्या दोन ओळखदारांची ओळख घेणे
5. साक्षीदारांची साक्ष नोंदविणे
6. दस्ताची नोंदणी करुन मूळ दस्त स्कॅन करणे
7. मूळ दस्त,थंबनेल प्रींट,सी.डी सादरकर्त्या पक्षकारास देणे